**सरकार वि. माधुरी गणेश चव्हाण**

निशाणी क्र. १६/क

सरकार तर्फे साक्षीदार क्र.२ ची जबानी
मी या व्दारे सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो कीः

| | |
|---|---|
| माझे नाव | - प्रिया राजेश कांबळे, |
| वय | - ३९ वर्षे, |
| हुद्दा | - महिला पोलिस हवालदार/ ब.क्र.१३३, |
| नेमणूक | - कर्जत पोलिस स्टेशन. |

**सरतपास सरकारी वकील श्रीमती पी. टी. बुये यांचे मार्फत शपथेवर सुरु....**

१) दि. २८/०३/२०२५ रोजी मी तसेच माझ्या सोबत सहाय्यक फौजदार कोळेकर, महिला पोलीस हवालदार म्हात्रे असे रसायनी पोलीस स्टेशन हद्दीत अवैद्य दारु धंद्यांवर कारवाई करण्याकामी खाजगी वाहनाने पेट्रोलिंग करत असताना मला बातमी मिळाली की, वाशिवली गावच्या हद्दीत केळकर कंपनीच्या समोर एक महिला बेकायदेशीररित्या दारु विक्री करत आहे. त्यानंतर आम्ही वाशिवली गावच्या हद्दीत केळकर कंपनी समोर गेलो. तेथे सहाय्यक फौजदार कोळेकर यांनी दोन पंचांना बोलावून घेतले. त्यांना बातमीचा आशय समजावून सांगितला. त्यानंतर आम्ही केळकर कंपनी समोर आमच्या गाड्या लावून पायी चालत जात असताना आई एकवीरा खानावळच्या समोर एक महिला काळ्या रंगाची पिशवी घेवून बसलेली दिसली. आम्ही तिला जागीच पकडले व तिचे नाव विचारले असता तिने तीचे नाव माधुरी गणेश चव्हाण असे सांगितले. त्यावेळी तीच्या ताब्यात जी.एम. संत्रा देशी दारुच्या २४ बाटल्या मिळून आल्या. सदरच्या बाटल्या सहाय्यक फौजदार कोळेकर यांनी पंचांसमक्ष जप्त करुन जप्त मुद्देमालातून एक बाटली रासायनिक तपासणी करीता काढून घेतली. तसा सविस्तर पंचनामा सहाय्यक फौजदार कोळेकर यांनी पंचांसमक्ष केला. त्यानंतर मी घटनेबाबत फिर्याद दिली. आता मला दाखविण्यात आलेली फिर्याद तिच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यावरील मजकूर खरा व बरोबर आहे. फिर्यादीस **निशाणी क्र.१७** देण्यात आली आहे. प्रथम खबर अहवालाच्या

प्रतीस **निशाणी क्र.१८** देण्यात आली आहे. आरोपीला पाहील्यास मी ओळखू शकते. आरोपी आज न्यायालयात हजर आहे.

**सरतपास संपला.**

**<u>उलटतपास आरोपीचे वकील श्री. हर्षद पाटील यांचेमार्फत सुरु...</u>**

२) हे म्हणणे खरे आहे की, मी फिर्याद देण्यापूर्वी घटनास्थळाची मालकी दाखविणारे कागदपत्र पाहिले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, रासायनिक तपासणी अहवाल येण्यापुर्वीच मी फिर्याद दिलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, जप्त मुद्देमाल आज न्यायालयासमोर हजर करण्यात आलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला खाजगी वाहनाचा नंबर व पंचांची नावे सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्याचे पंच नेहमीचे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही पंचनामा पोलीस स्टेशनमध्ये तयार केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचा गुन्ह्याशी काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचा ताब्यात कोणताही मुद्देमाल मिळून आलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास संपला.**

**फेर तपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत.**

Digitally signed by DIPALI SUBHASH KHOT
Date: 2026.07.01 15:09:47 +0530

**( डी. एस. खोत )**
न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग,
कोर्ट क्र.२, खालापूर.

स्थळ - खालापूर.
दिनांक - ०१/०७/२०२६